# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४ चा महा. ३५) या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(विद्या विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५ फोन:०७१३२ – २१६५५४, २२३१०४,२२३३२३


जा. क्र/गों.वि/वि.वि/576/२०१८ दि. १४/१२/२०१८

## परिपत्रक

### "लोकशाही, निवडणूक आणि सुशासन"

**दिनांक २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवाडा" साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :– मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय क्र. कार्या– १०/अ. का ग्रापंनि/कावि– ३३९९/२०१८ दिनांक : ५ डिसेंबर, २०१८ रोतीचे पत्र.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, दिनांक २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवाडा" साजरा करावयाचा आहे. त्याकरिता महाविद्यालयातील नोडल अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या सहकार्याने खालीलप्रमाणे दिलेले उपक्रम महाविद्यालयात राबवावे.

### : लोकशाही पंधरवाडा अपेक्षित कार्यक्रम :

### (दिनांक २६/०१/२०१९ ते १०/०२/२०१९)

**१. लोकशाही क्लब ची स्थापना करणे –**

महाविद्यालय स्तरावर लोकशाही क्लबची स्थापना करणे.

**रचना** – यामध्ये कार्यकारिणी तयार करावी. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व इतर सदस्य असावेत. कार्यकारिणी मुलीचे प्रमाण ५०% इतके असावे.

**२. निवडणूक प्रक्रिया प्रकल्प –**

मतदानाचे महत्व समजावून सांगणे. योग्य उमेदवारांची निवड करण्यासंदर्भात जाणीव जागृती करणे.

मंत्रीमंडळ तयार करुन मॉक पार्लमेंट (Model Parliament) आयोजित करणे.

**३. चर्चा सत्राचे आयोजन –**

**विषय:**

१. देशाच्या विकासासाठी भारतीय लोकशाही.
२. जनतेकडील लोकशाहीचे स्वामित्य.
३. निवडणूकित धनशक्तिचा वापर.
४. राजकारणाचे गुन्हेगारीकरण.
५. वंचित व दुर्बल घटकाची राजकीय सहभागाबद्दल अनास्था.
६. पेड न्युज आणि समाज माध्यमाच्या वापर.
७. निवडणूक खर्च आणि आचारसंहिता.

**४. पथनाट्य स्पर्धा, चारोळी वाचन स्पर्धा व घोषवाक्य स्पर्धा–**

१. लोकशाहीची मुल्ये जनतेमध्ये रूजविण्याबाबतची पथनाटये.
२. भारतीय संविधानावर आधारित चारोळी स्पर्धा.
३. लोकशाहीच्या सुदृढतेसाठी घोषवाक्य स्पर्धा.

**५. निबंध – वत्कृत्व व वादविवाद स्पर्धा–**

१. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही.
२. महात्मा गांधी यांची ग्रामविकासाची संकल्पना.
३. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी राजकिय पक्षाची भूमिका.
४. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम यांच्या स्वप्नातील भारत.
५. प्रादेशिकता आणि धर्म, जात यांचे राजकारण.

**६. पोस्टर स्पर्धा –**

पंचायतराज व्यवस्था, भारतीय संविधान, ग्रामविकास, महिला सक्षमीकरण, शेतकरी आत्महत्या, स्वच्छ भारत – सुंदर भारत या विषयावर आधारित पोस्टर स्पर्धा महाविद्यालयीन परिसरात आयोजित करावी.

७. **स्थानिक स्वराज्य, संस्थाना भेटी व पदाधिकाऱ्यांचे अनुभवकथन**

१. परिसरातील स्थानीक स्वराज्य संस्थाना भेट देवुन विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मुल्याबाबत जाणीव जागृती निर्माण करणे.

२. महाविद्यालयात स्थानीक स्वराज्य संस्थाच्या पदाधिकाऱ्यांच अनुभव कथन

३. गावात मतदान– जागृती बाब रॅलीचे आयोजन करणे.

४. एक मत– एक मुल्य याबाबत ग्रामस्थामध्ये विचार रुजविणे.

५. योग्य उमेदवाराची निवड तर गावाचा विकास ही संकल्पना राबविणे.

उपरोक्तप्रमाणे **"लोकशाही पंधरवाडा"** कार्यक्रम तसेच अन्य संकल्पना आपल्या कल्पनेने राबवून त्याचा अहवाल दि. २३ फेब्रुवारी २०१९ पर्यंत उपकुलसचिव, विद्या विभाग यांचे academic.gug@gmail.com वर मेल करावे. तसेच हार्ड कॉपीमध्ये पाठवावे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मा. कुलगुरु यांच्या आदेशान्वये

(दिपक जुनघरे)
उपकुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रतिलिपी :–**

१. मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव समादाराने सादर.
२. मा. प्र– कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव समादाराने सादर.
३. मा. कुलसचिव महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव समादाराने सादर.
४. मा. परिक्षा व मुल्यमापण मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव समादाराने सादर.
५. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीती व कार्यवाहीस्तव सादर.
६. मा. सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 809 दि. 12/12/18
आवक क्र. ...... दि. ......

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
क्र. 16820 दि. 7/12/18
क्र. 16820 दि. 7/12/18

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
जावक क्र. 1166 दि. 11/12/18
आवक क्र. 3102 दि. 11/12/18

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 6396 दि. 11/12/18
जावक क्र. 1055 दि. 12/12/18

निवडणूक तात्काळ

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय
क्र.कार्या-१०/अ.का.ग्रापंनि/कावि-3344/२०१८
दिनांक :- ५ डिसेंबर, २०१८

संदर्भ:- १.मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र,मुंबई यांचे कार्यालयीन पत्र रानिआ/रापनो-२०१७/प्र.क्र.१४/का-११, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८

२. या कार्यालयाचे पत्र क्र.कार्या-१०/अ.का.ग्रापंनि/कावि- ३३६३ /२०१८- दिनांक ३ डिसेंबर,, २०१८

**आदेश**

संदर्भिय आदेशान्वये गडचिरोली जिल्हयात जिल्हा मुख्यालय,तालुका मुख्यालय व ग्रामपंचायत स्तरावर दिनांक २६ जानेवारी, २०१९ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवाडा" साजरा करावयाचा असुन लोकशाही पंधरवाडयामध्ये "जागरुक मतदार,लोकशाहीचा आधार!" हा विषय (Theme) आधार मानुन लोक जागृती संदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

संदर्भिय २ वरील पत्रान्वये लोक जागृती संदर्भात प्राप्त निर्देशाचे काटेकोरपणे पालन करुन लोक जागृती संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास जिल्हयातील संबधित अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

सदर कार्यक्रमाचे परिपुर्ण नियोजन करुन स्थानिक पातळीवर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा पातळीवर कार्यक्षम नोडल अधिकारी म्हणुन श्री एन. एम. ठाकरे,तहसिलदार (जमीन शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली ( मोबाईल क्रमांक ९७६४८५३५८० ईमेल rdcgadchiroli@gmail.com) यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

(का.टि. मा.जिल्हाधिकारी व्दारा अनुमोदित)

(सही)
जिल्हाधिकारी गडचिरोली करिता

प्रतिलीपी :- १. मा.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
२.मा.कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांना माहितीस व उचित कार्यवाहीस्तव.
३.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली यांना माहितीस व उचित कार्यवाहीस्तव.
४.सहायक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र,मुंबई यांना माहितीस सादर
५.उप विभागीय अधिकारी,----------------(सर्व) यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
६.शिक्षणाधिकारी,(माध्यमिक/प्राथमिक) जिल्हा परिषद,गडचिरोली यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित
७.जिल्हा क्रिडा अधिकारी,गडचिरोली यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित
८.जिल्हा माहिती अधिकारी,गडचिरोली यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित
९.तहसिलदार-------------(सर्व) यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित
१०. गट विकास अधिकारी, -------------(सर्व) यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित
११.श्री एन.एम.ठाकरे,तहसिलदार (जमीन शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित.

(सही)
जिल्हाधिकारी, गडचिरोली करिता

Registrar
11/12/2018

उ.कु. (विद्या विभाग) / उ.कु. (आस्था)

12/12/18